विद्यावर्धिनी संचालित,

## अण्णासाहेब वर्तक मानव्य, केदारनाथ मल्होत्रा वाणिज्य व ई. एस. अंड्राडिस विज्ञान महाविद्यालय

वसई रोड (प.), जि. पालघर - ४०१२०२ (मुंबई विद्यापीठाशी संलग्न)

मराठी विभाग

आणि

भारतीय सामाजिक विज्ञान अनुसंधान परिषद (ICSSR), पश्चिम विभागीय केंद्र, मुंबई


Indian Council of Social Science Research

यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित

MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

# विद्यावार्ता

International Peer reviewed Research Journal



## ।। संत साहित्याची समकालीनता ।।

## एक दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र

शनिवार दि. १७ डिसेंबर २०२२

समन्वयक
डॉ. शत्रुघ्न फड
(मराठी विभाग प्रमुख)
९४२२६७०५३०

सहसमन्वयक
डॉ. सखाराम डाखोरे
(सहाय्यक प्राध्यापक)
९८५०११६६४५

प्रा. शैलेश औटी
(सहाय्यक प्राध्यापक)
९८३३४८७४६८

निमंत्रक
डॉ. अरविंद उबाळे
(प्राचार्य)

26) संत साहित्य आणि समाजप्रबोधन
श्रीराम विलास तिडके, लातूर ||127

27) संत जनाबाई एक आकलन
निकिता अनिल शेंडगे, पुणे ||129

28) लोकसंस्कृती समृद्ध करणारे नाशिक संत भूमितील लोकोत्सव
डॉ. पौर्णिमा शिवाजी बोडके, पंकज केवळ पवार, नाशिक ||131

29) संत साहित्य आणि समाज प्रबोधन
पूनम सावळे, औरंगाबाद ||135

30) संत मीराबाई व संत मुक्ताबाई यांचे भक्तीविचार
प्रा. संदीप भागू चपटे, शिवळे ||137

31) संत साहित्यातील संत कवयित्रीचे योगदान
वीणा रमेश गुल्देवकर, औरंगाबाद ||143

32) संत जनाबाईच्या अभंगातील संत कबीरदर्शन
रोहिदास कुंडलिक खेडकर, पुणे ||146

33) संत ज्ञानेश्वर व संत एकनाथ यांच्या हरिपाठांचे काव्यसौंदर्य व त्यातील मिथकांचा अभ्यास
प्रा. डॉ. रवींद्र श्रीहरी सोमोशी, जिल्हा रायगड – महाराष्ट्र ||150

34) संतवाटिकेतील जाईची वेल: संत जनाबाई
प्रा. डॉ. हनुमंत भवारी, जि. पुणे ||153

35) संत कवयित्रींचे मराठी साहित्यातील योगदान
डॉ.दर्शना सलिल चौधरी, पालघर ||157

36) वारकरी आचार धर्मसंकल्पना, स्वरूप
प्रा.डॉ. नाथराव ज्ञानोबा गरजाळे, जि.बीड ||160

37) स्त्रीमनाचा हुंकार : संत जनाबाई
डॉ.रश्मी शेटये तुपे, माडुंगा ||165

38) महात्मा बसवेश्वरांची मूल्यदृष्टी
डॉ.शंकर हणमंतराव कल्याणे, जि.लातूर ||168



http://www.printingarea.blogspot.com | http://www.vidyawarta.com/03

MAH MUL/03051/2012
ISSN: 2319 9318 | Vidyawarta® Peer-Reviewed International Journal | Special Issue-01 Dec.2022 | 0157

35

# संत कवयित्रींचे मराठी साहित्यातील योगदान

डॉ.दर्शना सलिल चौधरी
सोनपंत दांडेकर महाविद्यालय पालघर

**********

**प्रस्तावना:** तेराव्या शतकापासून १७ व्या शतकापर्यंतच्या कालखंडात संतसाहित्याची गौरवशाली परंपरा दिसून येते. महानुभाव, वारकरी आणि समर्थ अशा तीन संप्रदायांनी या काळात वांग्मयनिर्मिती केली.या संप्रदायातून पुढे आलेल्या महदंबा, मुक्ताबाई, जनाबाई, बहिणाबाई, कान्होपात्रा, सोयराबाई, निर्मला आणि वेणास्वामी या संत कवयित्रींनी मराठी साहित्याला दिलेली योगदान अभ्यासनीय ठरले आहे. प्रस्तुत शोधनिबंधात 'संत कवयित्रींनी मराठी साहित्य समृद्ध केले आहे'. हे गृहीतक स्वीकारून उहापोह केला आहे.याविषयीचे चिंतन मांडत असताना 'श्री सकल संतगाथा' यात समाविष्ट असलेले अभंग आणि पूर्वसुरींनी केलेले चिकित्सक संशोधन उपयुक्त ठरले आहे.

**महदंबा:** मराठीतील आद्य कवयित्रीचा मानमहदंबा, महदाइसा उर्फ रूपाईसा या महानुभावी संत कवयित्रीला दिला जातो. स्त्रीकाव्याची मुहूर्तमेढ रोवली असून तिने रचलेले ढवळे सुपरिचित आहेत. ढवळे म्हणजेच विवाहगीत. गोविंद प्रभूंच्या विवाहप्रसंगीकृष्ण रुक्मिणी विवाह कथातिनेउत्कटतेने गायलेली.मराठी साहित्याला दिलेले ते एकअपूर्व देणे आहे.

ढवळ्याचे पूर्वार्ध व उत्तरार्ध असे दोन भाग आहेत. सहज, साध्या, अनलंकृत भाषेत ढवळे रचले आहेत.महदंबेच्या लेखनाला तत्कालीन विशिष्ट पंथीय, धार्मिक,सांस्कृतिक संदर्भ असले तरीवांग्मयीनदृष्ट्या देखील ढवळे अभ्यासनीय आहेत.मातृकी रुक्मिणी स्वयंवर हे आणखी एक काव्य तिने रचले आहे.

**मुक्ताबाई:** ज्ञानदेवादी भावांपैकी एक असलेली मुक्ताबाई आपल्या काव्यप्रतिभेने संत कवयित्री मध्ये लक्षवेधी ठरली.तिचे ४२ अभंग आहेत.'मुक्तता पूर्णता मुक्ताई साधली' असा मुक्तीचा उद्घोष त्या अभंगातून करताना दिसतात. मुक्ताबाईचा आध्यात्मिक अधिकार मोठा होता. चांगदेवासारख्या हठयोगीने त्यांना गुरु मानले होते. 'अखंड जयाला देवाचा शेजार। कारे अहंकार नाही गेला ।।' अशा शब्दात त्यांनी नामदेवांची कान उघडणीकेलीय तर रुसलेल्या ज्ञानदेवांची मनधरणी करताना त्यांनी रचलेले ताटीचे अभंग प्रसिद्ध आहेत.

योगी पावन मनाचा । साहीअपराध जनाचा ।।
विश्वरागे झाले वन्ही। संती सुखी व्हावे पाणी ।।
शब्द शस्त्रे झाले क्लेश। संती मानवा उपदेश।।
विश्वपट ब्रम्ह दोरा। ताटी उघडा ज्ञानेश्वरा।।

मुक्ताबाईने कूट रचना केली आहे. त्यापैकी 'मुंगी उडाली आकाशी । तिने गिळले सूर्याशी।। ही कुटरचना विशेष प्रसिद्ध आहे.

गुण ना निर्गुण शब्दातीत
तेथे तू निश्चिंत निज बाळा ।।
पाळणा लाविला हृदयकमळी
मुक्ताई जवळी सादविते ।।

अशा प्रकारची रचलेली आध्यात्मिक अंगाईगीते किंवा 'पाळणा' अर्थपूर्ण ठरले आहेत.

मुक्ताबाईचे योगीक सामर्थ्य ओव्यांमधून प्रकट झाले आहे.

उदा.पहिली माझी ओवी । प्रात:काल होता । गाईला विधाता । त्रिकूटीचा ।।
त्रिकुटीचा देवद्यआचार क्रियाशक्ती । स्थूलदेही वर्ततीधरत्तप्रभा ।।

हरिपाठाच्या अभंगात नामस्मरणाचे महत्व सांगताना मुक्ताबाई म्हणतात,

'वेदे बोलियेले ब्रम्हार्पण भावे
सदामुक्त व्हावे अरे जना।।
मुक्ताई मुक्त हरिनाम सेवित
अवघेची मुक्त सेविता हरी ।।

अल्पायुशी असलेल्या मुक्ताबाईची अभंगरचना मात्र दीर्घायुष्य ठरलेली दिसते. 'अहो मुक्ताबाई तू ब्रह्माचे अंजन। तुझेचि प्रसादे सद्गुरुनिधान।' असे ज्ञानदेवांनी तिचे महात्म्य प्रतिपादन केले आहे तर

महारी' असा स्वत:चा उल्लेख अभंगातून करणाऱ्या सोयराबाई पतीप्रमाणे ईश्वरभक्तीत तल्लीन झाल्या.

हीन जातीत जन्माला आल्यामुळे भोगाव्या लागणाऱ्या यातना त्यांनी अभंगातून मांडल्या तर दुसरीकडे भक्तीच्या आणि अध्यात्मिक साधनेच्या बळावर स्वत:चा उद्धार करून घेतला. विठ्ठलाशी साधलेला अखंड संवाद आणि विठ्ठलाची झालेली अनुभूती याचा प्रत्यय त्यांच्या अभंगातून येतो.

'हीन हीन म्हणोनी का गं मोकलिले
परी म्या धरिले पदरी तुमच्या
आता मोकलिता नव्हे नित बरी
थोरा साजे थोरी थोरपणेद्य' अशाशब्दात त्या विठ्ठलाला जाब विचारतातय तर कधी
देहाची विटाळ म्हणती सकळ
आत्मा तो निर्मळ शुद्ध बुद्ध
देहीचा विटाळ देहीच जन्मला
सोवळा तो झाला कवणधर्म'

असे म्हणत देहाचा विटाळ मानणाऱ्यांना साधे सरळ तत्त्वज्ञान सांगतात.

**निर्मळा:** चोखोबांची बहिण निर्मळ यांनी देखील अभंग निर्मिती केली आहे.त्यांचे २४ अभंग आहेत.

'मज नामाची आवडी संसार केला देशधडी।
सापडले वर्म सोपे। विठ्ठल मंत्र जपे।'

असे नामजपाचे महात्म्य अभंगातून प्रतिपादन केले आहे.

'चहुंकडे देवा दाटला वणवा। कांन येकनवा तुजलागी' तर कधी 'का हो पांडुरंगा मज मोकलिलें। पराधीन केले जिणे माझे।' असा प्रश्न ती विठ्ठलाला विचारते.

**कान्होपात्रा:** कान्होपात्रा ही पंढरपूरजवळील मंगळवेढ्यच्या श्यामागणिकेची मुलगी.तिच्या जन्मकाळाबद्दल अभ्यासकांमध्ये मतभेद दिसतात. कान्होपात्राची विठ्ठल भक्ती निस्सीम होती.बेदरच्या बादशहाने तिच्या सौंदर्याची कीर्ती ऐकून तिला आणण्यासाठी शिपाई पाठवले,त्यावेळी तिने परमेश्वराला घातलेली आर्तसाद विठ्ठलापर्यत पोहोचलीवतीपरमेश्वर चरणी लीन झाली अशी आख्यायिका प्रचलित आहे. 'नको देवराया अंत आता पाहू। प्राण हा सर्वथा फुटोपाहे।।' असे म्हणत आपल्या मनाची अवस्था तिने विठ्ठलापाशी व्यक्त केली.तिचे एकूण २३ अभंग उपलब्ध आहेत.यातिहीन असल्याचा उल्लेख तिच्या अभंगात येतो.

'दीनपतीत अन्यायी। शरण आले विठाबाई।।
मी तो आहे यातिहीन। न कळे काही आचरण।।'

असे म्हणत विठ्ठलाला ती शरण जाताना दिसते.

**वेणाबाई:** रामदासी शिष्य वेणाबाइ/वेणास्वामी यांनी अभंगातून रामदास स्वामींबद्दलची गुरुभक्ती व्यक्त केली आहे.बालविधवेचे आयुष्य वाटेला आलेली वेणाबाई समर्थांच्या कृपादृष्टीने अंतर्बाह्य बदलून गेली. जननिंदेची पर्वा न करता ती समर्थ चरणी लीन झाली. वेणी– वेणाई– वेणास्वामी हा तिचा प्रवास म्हणजे सामान्य विधवा स्त्रीचा समर्थांच्या कृपेने साधकावस्थेकडे आणि नंतर ईश्वर साक्षात्कार झालेली प्रगल्भ अशी परमार्थ क्षेत्रातील अधिकारी व्यक्ती म्हणून झालेला अलौकिक प्रवास आहे. 'कोणी वंदिती,कोणी निंदितीद्य वास मी त्यांची पाहिना हृदयीं धरले गुरुचरण। प्राणांतीही विसंबेना।।'

घरच्यांनी तिच्यावर केलेल्या विषप्रयोगानंतर देखील समर्थक कृपेने तीवाचली व त्यानंतर त्यांच्या समवेत पुढील आयुष्य व्रतस्थपणे जगली.संक्षिप्त रामायण,सीता स्वयंवर ही काव्यरचना वेणाबाईंनी केली. उपदेशरहस्य कौल,पंचीकरण,श्रीराम गुह संवाद ही छोटी प्रकरणे देखील वेणाबाईच्या नावावर आहेत.त्याशिवाय बरीच स्फूट स्वरूपाची काव्यरचना त्यांनी केली आहे.

**निष्कर्ष :** संत कवयित्रींच्या काव्यनिर्मितीच्या आढावा घेतल्यानंतर पुढील निष्कर्ष हाती येतात.

१. महानुभाव,वारकरी आणि रामदासी संप्रदायातील भक्तीमार्ग वतत्त्वज्ञान संत कवयित्रींनी अभंगातून मांडले.

२. स्त्री म्हणून वाटेला आलेली वंचना जशी त्यांच्या अभंगातून व्यक्त तशी त्यावर मात करून स्वत:चा उद्धार करण्याची आत्मशक्ती देखील प्रकट होते.

३. जनाबाई,सोयराबाई,निर्मला,कान्होपात्रा यांच्या अभंगात हीन जातीत जन्मल्यामुळे वाट्याला आलेल्या दु:खभोगाचा सूर उमटला आहे. काही वेळा विठ्ठलाला जाबही विचारला आहे.

४. बहिणाबाई,वेणाबाई यांना विधवा म्हणून लोकनिंदेला

'मुक्तपणे मुक्त श्रेष्ठपणे श्रेष्ठद्य सर्वत्रीवरिष्ठ आदिशक्ती ।" असे म्हणून एकनाथांनी तिचे श्रेष्ठ पण मान्य केले आहे.

जनाबाई'नामयाची दासी जनी' असा स्वत:चा उल्लेख करणारी जनाबाई तिच्या आध्यात्मिक शक्तीने संत पदाला पोहचली. नामदेवांच्या सानिध्यात विठ्ठलभक्तीची ओढ तिला लागली,त्यातूनच तिने अभंग निर्मिती केली.

'झाडलोट करी जनी। केरभरी चक्रपाणी।' असे म्हणत विठ्ठलाचे आपल्या समावेत असणे जनीने अनुभवले. त्याच्याशी ती एकरूप झाली.तो तिला कधी माऊलीच्या रूपात भेटतो तर कधी सहचर होऊन तिला अखंड सोबत करतो.

'तुळशीचे बनी। जनी उकलित वेणी।
हाती घेऊनिया लोणी। डोई चोळी चक्रपाणी।
माझे जनीला नाही कोणी। म्हणूनीदेव घाली पाणी।
जनी सांगे सर्व लोका। न्हाऊ घाली माझा सखा।।'

नामस्मरणाचे महात्मे तिने अभंगातून गायले.

'हरी बोला कांडता। हरी बोला भांडता।
उठता बसता हरी बोला।।

असा साध्या सोप्या शब्दात तिने नाममहात्म्याचा सुलभ मार्ग लोकांना दाखवला.अन्याय,लोकनिंदा सहन करणारी जनी विठ्ठल अनुभूतीमुळे धीट झालेली दिसते. तिचीबंडखोर वृत्ती तिच्या अभंगातून प्रगट करताना ती म्हणते,'डोईचा पदर खांद्यावरी आला। भरल्या बाजारी जाईन मी। हाती घेऊनिया टाळ खांद्यावरी विणा। आता मज मना कोण करी।।'

स्त्रीमुक्तीचे वारे वाहण्याच्या कितीतरी शतके आधी जनाबाईनी धरलेली मुक्तीची वाट कौतुकास्पद तसेच आश्चर्यकारक होती.विठ्ठलाशी तिने साधलेली जवळीक प्रकट करताना ती त्याला कधी 'पंढरीचा चोर' म्हणतेय तर कधी 'अरे विठ्ठ अरे विठ्ठ मूळ मायेच्या करंट्य' अशा शब्दात भांडतानाही दिसते. विठ्ठलमय जनीचा आध्यात्मिक प्रवास तिच्या अभंगातून अभिव्यक्त झाला आहे.'विठु माझा लेकुरवाळा। संगे गोपाळांचा मेळा।।' असे म्हणत लेकुरवाळ्या विठ्ठलाचेतिने केलेले वर्णन विलोभनीय आहे. जनाबाईंनी केवळ अभंग निर्मिती केली नाही तर जात्यावरच्या ओव्या देखील रचल्या.

'सुंदर माझे जाते ग फिरे बहुतेक।
ओव्या गाऊ कौतुके तू येरे बा विठ्ठला।'

जनाबाईच्या ओव्यांचा नाद अनेक शतकेस्त्री जीवनात घुमत राहिला आहे.

एकनाथांच्या प्रसिद्ध भारुडाची आठवण करून देणारे 'खंडेराया तुज करिते नवसु मरू दे रे सासू खंडेराया। सासू मेल्यावरी तुटेला आसरा मरू दे रे सासरा खंडेराया। हे जनाबाईचे भारुड प्रसिद्ध आहे.

अभंग, ओवी, भारुड अशी काव्यरचना करून जनाबाईनी मराठी संत साहित्याला दिलेले योगदान महत्त्वपूर्ण आहे.

**संत बहिणाबाई:** सतराव्या शतकात होऊन गेलेल्या संत कवयित्री बहिणाबाईनी आत्मपरभंगातून तिचे जीवनचरित्र उलगडले आहे.स्त्री आत्मचरित्र लेखनाची ही काव्यात्मक सुरुवात म्हणावी लागेल.तिच्या अभंगाचे तीन भागात वर्गीकरण करता येते.

१.बहिणाबाईच्या जन्मापासून तिच्या मुलीच्या जन्मापर्यंतचे अभंग.

२.पती समवेतचे कष्टमय आयुष्य,साधना,तुकाराम दर्शन व त्यांच्याकडून मिळालेले शिष्यत्व व कवित्वाची प्रेरणा.

३.शेवटच्या क्षणी तिला स्मरलेले बारा पूर्वजन्म व वर्तमान जन्माची हकीकत.

ज्ञानदेव,नामदेव,एकनाथ आणि तुकाराम या संतांच्या कार्याची ओळख करून देणारा बहिणाबाईचा अभंग सुपरिचित आहे.

'संतकृपा झाली इमारत फळा आली।
ज्ञानदेवे रचिला पाया उभारले देवालया।।
नामा तयाचा किंकर तेणे केले केला हा विस्तार।
जनार्दन एकनाथ थांब तिला भागवत।
तुका झालासे कळस भजन करा सावकाश।
बहिणी म्हणे फडकती ध्वजा निरूपण केले ओजा।।'

भागवत धर्माच्या कळसावरील 'फडकती ध्वजा' असलेली बहिणाबाई आपल्या अभंग निर्मितीने लक्ष वेधून घेते.

**सोयराबाई** : चोखोबांच्या पत्नी सोयराबाई यांच्या नावावर सकल संत गाथेत ६२ अभंग आहेत.'चोख्याची

सामोरे जावे लागले मात्र तरीही त्यांनी भक्तिमार्गावर वाटचाल करून अभंग निर्मिती केलेली दिसते.

५. धवळे,अभंग,ओवी,भारुडेव स्फूटरचना अशी काव्य निर्मिती करून संत कवयित्रींनी मराठी साहित्याला समृद्ध केले आहे.

**संदर्भग्रंथ:**

केजकर प्रकाश: संत कविता एक दृष्टिकोन, स्वरूप प्रकाशन, प्रथम आवृत्ती सप्टेंबर २००६

गणोरकर प्रभा: मराठीतील स्त्रियांची कविता, लोकवांग्मय गृह,मुंबई,प्रथम आवृत्ती २०१५

भावे वि.ल., महाराष्ट्र सारस्वत,पाचवी आवृत्ती,शके १८८५

दातार आरती: महाराष्ट्रातील संत कवयित्री, डायमंड पब्लिकेशन,पुणे,प्रथम आवृत्ती २००६

जोशी काशिनाथ (संपादक), श्रीसकलसंतगाथा, खंड पहिला,श्री संतवांग्मय प्रकाशन मंदिर,सदाशिव पेठ,पुणे, दुसरी आवृत्ती १९६७

❑❑❑

**36**

# वारकरी आचार धर्मसंकल्पना, स्वरूप

**प्रा.डॉ. नाथराव ज्ञानोबा गरजाळे**
विभाग प्रमुख, मराठी भाषा व साहित्य विभाग,
कला व वाणिज्य महिला महाविद्यालय,
अंबाजोगाई. जि.बीड

**********

कोणत्याही धर्म—पंथात त्या धर्माचे तत्वज्ञान आणि त्यानुसार कृतीत आलेला अंतरंग व बाह्य आचारधर्म या दोहोना महत्त्वाचे स्थान असते.धर्माचे, संप्रदायाचे तत्त्वज्ञान व साधनांचे तारतम्य यावर संप्रदाय जनमानसात रुजून मोठा होतो. धर्माचे तत्वज्ञान म्हणजे जीव,जगत व परमेश्वर या प्रकृतीशी आणि परतत्वाशी निगडित असलेल्या विषयांचे ज्ञानात्मक चिंतन होय. या ज्ञानानेच मानवाला आपल्या जीवनाचे स्वरूप काय?जीवनाची इतिकर्तव्यताकोणती? पारमार्थिक ध्येय कोणते? हे ठरविता येते. एकदा ध्येय निश्चित झाले कीय मग त्या ध्येयाच्या अगर साफल्याच्या प्राप्तीचा मार्ग कोणता? साफल्यप्राप्तीसाठी कोणत्या पातळीवरचे वर्तन असावे? आपला आयुष्यक्रम कसा असावा? कोणत्या गोष्टींचा आचरणाच्या पातळीवर स्वीकार करावा आणि कोणत्या बाबींचात्याग करणे एहिक आणि परमार्थिक सफलतेसाठी गरजेचे आहे? शाश्वत आणि तात्कालिक अशा कोणत्या मूल्यांच्या विकासासाठी मानवाने प्रयत्नांची पराकाष्टा करावी? या सर्व बाबी धर्माच्या व आचारधर्माच्या संकल्पनेच्या पातळीवर महत्त्वाच्या ठरतात. याचा अर्थ कोणत्याही तत्वज्ञानाचे कार्य केवळ ज्ञान देणे एवढेच नसून मानवी जीवनास त्या तत्त्वज्ञानाने कर्मयोगासहसर्व पातळ्यांवर मार्गदर्शन केले पाहिजे. त्या तत्त्वज्ञानाची अनुभूती कशी घ्यावी हे सांगावे लागते. आचारधर्माचा कृतिशील उपदेश करावा लागतो.जीवनात ते तत्वज्ञान योजनाबध्द पध्दतीने मुरविले पाहिजे. त्या त्या